# बिबट, सांबर ची हत्या अवयव तस्करीकरिता?

## क्राईम सेलचे पथक दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.29 )** – मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या अति संवेदनशील मानल्या जाणाऱ्या चिखलदरा गुगामल वन्यजीव वनपरिक्षेत्रातील चुरणी वर्तुळात वन खंड क्रमांक 38 मध्ये सोमवारी( दि.27) मृतावस्थेत आढळलेल्या बिबट आणि सांबर (हरिण) ची हत्याच ही अवयवांच्या तस्करीतून झाल्या असल्याचा संशय वनविभागाकडून व्यक्त केला जात असल्याची माहिती आहे. बुधवारी वनविभागाच्या क्राईम सेल ने घटनास्थळी धडक देत आपल्या तपासाला गती आणली आहे.



शिकाऱ्याने या दोन्ही वण्यप्राण्यांची हत्या करत, त्यांचे पाय बांधून पुनर्वसित चुरणी या गावातील विहिरी मध्ये लटकविले. जेणेकरुन विहिरीमध्ये टाकल्यावर कुणालाही हे मृतदेह दिसणार नाही आणि या वण्यप्राण्यांचे नख, शिंग व इतर अवयव सवडीनुसार काढून घेवून जाता येईल, अशी योजना शिकाऱ्यांची असावी, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. जंगल परिसरात ट्रॅप कॅमेरे, मोबाईल लोकेशन, खबऱ्याकडून माहिती घेणे, वनगुन्ह्यातील आरोपींची चौकशी अश्या विविध बाजूंनी तपास केला जात आहे. व्याघ्र प्रकल्पाच्या अतिसंवेदशील भागात ही शिकार झाल्याने वनविभागाला जणू शिकाऱ्यांनी आव्हानच दिले आहे. सोमवारी सकाळी साडे दहाच्या सुमारास वन कर्मचारी चुरणी वर्तुळात गस्तीवर असताना दुर्गंध आल्याने त्यांनी एका विहिरीमध्ये पाहिल्यावर एक बिबट व सांबर हरिणाची हत्या करुन त्यांना विहिरीच्या आतमध्ये टाकलेले आढळले होते.

# रहाटगाव स्मशानभुमीचा वाद

## जिल्हाकचेरीवर दोन्ही गट आमने-सामने



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.29 )** – रहाटगाव येथील स्मशानभुमीचा वाद दोन गटात सुरू आहे. एका गटाने 26 जानेवारीपासून बेमुदत उपोषणाला सुरूवात केल्याने अखेर जिल्हाधिकारी यांनी यातून मार्ग काढण्यासाठी बुधवारी( दि.29) बैठक बोलाविली होती. मात्र स्मशानभुमीला विरोध करणाऱ्यांनी जिल्हाकचेरीवर शक्तीप्रदर्शन करित शेकडो ग्रामस्थ एकत्र आले होते. दोन्ही गटातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी मध्यस्ती करण्याचा प्रयत्न केला. परंतु दोन्ही गट आपआपल्या भुमिकेवर ठाम असल्याने अखेर यावर कोणताच निर्णय होऊ शकला नाही.

रहाटगाव जुनी वस्ती येथे अनेक वर्षांपासून स्मशाभुमीचा उल्लेख असलेल्या जागेवर काही धार्मिक मंदीरांसह महानूभावपंथांचे देखील मंदीर आहे. त्यामुळे येथील काही भागातील अतिक्रमण काढून स्मशानभुमीसाठी जागा मोकळी करावी व येथे सुविधा द्यावी, या मागणीकरिता 26 जानेवारीपासून एका गटाने स्मशानभुमीत उपोषण सूरू केले आहे. मुंडन, अर्धनग्न असे विविध लक्षवेधी आंदोलन येथे केल्या जात असतानाच एका गटाने मात्र येथे स्मशानभुमी नकोच अशी भुमिका घेतली आहे. त्यामुळे स्मशानभुमीचा हा वाद संपुष्टात काढण्यासाठी बुधवारी( दि.29) सायंकाळी 5 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक बोलाविली होती. यामध्ये स्मशानभुमीच्या समर्थनार्थ प्रमुख पदाधिकारी उपस्थित असतानाच स्मशानभुमीला विरोध करणाऱ्या गटाचे तब्बल शंभर ते दिडशे लोकांनी हजेली लावून शक्तीप्रदर्शन केले. अखेरीस दोन्ही गटातील पाच प्रमुख पदाधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी यांनी चर्चेसाठी आमंत्रित केले. अर्धातासाच्या या बैठकीत दोन्ही गट आपआपल्या भुमिकेवर ठाम होते. यातून मार्ग काढायचा असेल तर आधी दोन्ही गटाने एकमेकांशी समन्वय साधावा, त्यानंतरच मी यातून मार्ग काढेल, असा सल्ला जिल्हाधिकारी यांनी देत बैठकीला विराम दिला.

बैठकीमध्ये महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, तहसिलदार विजय लोखंडे यांच्यासह स्मशानभुमिच्या समर्थणार्थ रमेश धामणकर, गोपाल कडू, गजानन रामेकर, आदीत्य पडोळे, रंजित दिवे, निखिल देवघरे तसेच स्मशानभुमीला विरोध करणाऱ्यांमध्ये सचिन चर्जन, महंत कारंजेकर बाबा, विनोद थेलकर, ॲड.स्वाती थेलकर, अरूण ठाकरे, सुभाष पावडे, प्रदीप चर्जन, शंकर इंगोले उपस्थित होते.

# त्या संचालकांवरील अविश्वास वैध

## जिल्हा मध्यवर्ती व शिक्षक बँकेतील विरोधी बाकावरील संचालक सर्वोच्च न्यायालयात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.29 )** – सहकार क्षेत्रात महत्त्वपूर्ण बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि शिक्षक सहकारी बँक वर्तुळात उच्च न्यायालयाच्या निकालानंतर खळबळ उडाली आहे. निकालामध्ये शिक्षक बँकेतील पाच विरोधी संचालकांवरील अविश्वास प्रस्ताव न्यायालयाने वैध ठरविला आहे. यामुळे आगामी कालावधीत यावर स्थगनादेश मिळविण्यासाठी या दोन्ही बँकेतील विरोधकांनी आता सर्वोच्च न्यायालयात जाण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.



जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेतील सत्ताधारी 14 संचालकांद्वारा पाच विरोधी संचालकांवर 4 जानेवारी 2024 रोजी अविश्वास प्रस्ताव आणून तो पारित केला होता. यामुळे प्रभाकर झोड, मंगेश खेरडे, मनोज चोरपगार, गौरव काळे व संजय नागे यांचे संचालकपद खारीज केले होते.

या विरोधात पाचही संचालकांनी कायदेशीर बाबी तपासून पाहण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने ठरावाला वैध ठरविल्याने शिक्षक बँकेत आता विरोधकच शिल्लक राहिलेला नाही. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि शिक्षक बँकेतील दोन्ही याचिका टॅग करून न्यायालयाने हा निर्णय दिला. जिल्हा बँकेचे प्रा. वीरेंद्र जगताप व अन्य 14 संचालकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून अविश्वास प्रस्तावाची परवानगी मागितली होती. उच्च न्यायालयाकडून टॅग असलेल्या दोन्ही याचिका निकाली काढण्यात आल्या. विरोधात निकाल लागल्याने दोन्ही बँकेमधील काही संचालक आता सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याच्या तयारी आहेत.

> यासंदर्भात न्यायालयीन निर्णयाचा आम्ही अभ्यास करणार असून, पुढे सर्वोच्च न्यायालयात दाद मागू, बहुमत तसेच आमच्यावर अविश्वास आला तरी आम्ही त्याला सामोरे जाऊ.
>
> **– अभिजित ढेपे, उपाध्यक्ष, जिल्हा बँक**

# मृतावस्थेत आढळली पोलिस कर्मचाऱ्याची मुलगी

## तपोवन परिसरातील जिजाऊ कॉलनीतील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )**– तपोवन येथील मार्डी रोडवरील जिजाऊ कॉलनी येथे राहणारे पोलीस कर्मचारी संजय राऊत यांची 25 वर्षीय मुलगी संस्कृती राऊत हिचा मृतदेह काल रात्री 9 वाजताच्या सुमारास तिच्या घरात जमिनीवर आढळला. यावेळी पोलीस कर्मचारी संजय राऊत त्यांच्या कर्तव्यावर गेले होते. त्याची पत्नी आणि दुसरी मुलगी कुठेतरी बाहेर गेली होती आणि परत आल्यावर ही घटना उघडकीस आली. त्यानंतर संपूर्ण परिसरात मोठा गोंधळ उडाला. संस्कृती राऊतचा मृत्यू हा खून आहे की आत्महत्या याबद्दल बातमी लिहिईपर्यंत शंका होती. या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती ग्रामीण पोलिसांच्या खल्लार पोलिस ठाण्यात तैनात आहेत.

# ते आंदोलन कोर्टचे मनाई आदेश विरुध्द?

## महावितरण चे स्पष्टीकरण ■ वीज खांबावर खाट बांधल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )**– वीज खांब स्थलांतरीत करण्यासंदर्भात न्यायालयाचे स्थगनादेश आहे. तसेच सदर काम हे जिल्हा नियोजनातून मंजूर करून प्रशासकीय मान्यता आणि निधीच्या उपलब्धतेसाठी प्रलंबित आहे. याचीही माहिती संबंधितांना देण्यात आली. तरीही वीज खांबावर चालू वीज वाहिनीखाली खाट बांधून आंदोलन करून महावितरणला व वीज ग्राहकांना वेठीस धरले. याप्रकरणी चांदुर बाजार तालुक्यातील सोनोरी येथील गृहस्थ विलास चर्जन यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम 223 आणि विद्युत कायदा 2003 कलम 138 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती महावितरणने दिली आहे.



महावितरण कडून सांगण्यात आले की, सोनोरी वार्ड क्रमांक 1 सोनोरी येथील उध्दवराव चर्जन यांच्या घराजवळील वीज खांब स्थलांतरीत करण्याबाबत सोनोरी ग्रामपंचायत यांनी लेखी पत्र दिल्यानंतर महावितरणकडून या कामाचे जिल्हा नियोजनातून (छक्क्ष्ट –ह्छस्ड्ढ 2024–25 / दि.29/11/24 ) अंदाजपत्रक मंजूर करून प्रशासकीय मान्यता व निधीसाठी प्रलंबित आहे. तथापि, दरम्यान किशोर रामकृष्णपंत मडघे यांच्यातर्फे ॲड.ए.बी.कडू यांच्याकडून वीज खांब स्थलांतरीत करण्याचे हे प्रकरण जिल्हा व सत्र न्यायालय अचलपूर यांच्याकडे दाखल झाल्यानंतर न्यायालयाने या कामाला स्थगनादेश दिले. त्यामुळे न्यायालयाची स्थगिती उठल्यानंतर आणि मंजूर अंदाजपत्रकाचा निधी प्राप्त झाल्यानंतर हे काम करण्यात येईल याची माहिती तक्रारदार विलास चर्जन यांना देण्यात आली, तरीही तक्रारदार विलास चर्जन यांनी वीज खांबावर चालू वीज वाहिनीखाली खाट बांधून त्यावर आंदोलन केले. वीज खांबावर अनधिकृतपणे चढून खांबावर खाट बांधणे, छत्री उभी करणे, त्यासाठी वीज पुरवठा बंद करण्यात आला. यामुळे इतर ग्राहकांनाही विनाकारण वेठीस धरणे व महावितरणच्या महसुलाचे नुकसान करणे ही कृती भारतीय न्याय संहिता कलम 223 आणि विद्युत कायदा 2003 कलम 138 अन्वये गुन्ह्यास पात्र ठरत असल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती महावितरणचे मोर्शी येथील कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट यांनी दिली आहे.

# धारणीत विजेसाठी शेतकरी उतरले रस्त्यावर

## 25 गावातील ग्रामस्थ धडकले एसडीओ कार्यालयावर



### ■ विजे अभावी पंचवीस गावे तहानलेली

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.29 )**– चिखलदरा तालुक्यातील पंचवीस गावाचे हजारो शेतकरी वीज शेतीसाठी व गावातील पाणीपुरवठा साठी वीज मिळावी म्हणून शासनाकडे गेल्या अनेक महिन्यांपासून मागणी करत आहेत. मागणी पूर्ण होत नसल्यामुळे उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढून मंगळवारी (दि.28) रोजी शेतकरी जनआंदोलन करण्यात आले.

भव्य असा मोर्चा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणातून काढून एसटी स्टँड जवळून दयाराम चौक मार्गे मुख्य रस्त्यावरून चर्च, होली चौक, जयस्तंभ चौक वरून उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला.



### पीठ गिरणीही बंद

विजेचा दाब कमी असल्याने पंचवीस गावाचा पाणी पुरवठा बंद आहे. पिठाची गिरणी बंद आहे, परीक्षेच्या कालावधीत वीज नसल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर याचा परिणाम होत आहे. मोबाईल चार्ज होत नसल्याने अनेक कामे विस्कळित होत आहे. बारु, टोळी, मंसुधावडी, झापल, बिजुधावडी, हातीदा, बोरिखेडा, सावऱ्या, गडगाभांडूम, ढाकणा, झिलांगपाटी तात्रा, गडगाभांडूम, गडगामांलुर, दाबिया, भांडूम बेराटेकी या गावचे सरपंच पदाधिकारी व गावकरी मोठया संख्येने महीला पुरुष मोर्चामध्ये सहभागी झाले होते.

उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. सभेमध्ये विविध गावाचे सरपंच यांनी सभेला संबोधित केले. सर्वप्रथम ढाकणा चे सरपंच शालिकराम बेठेकर यांनी आक्रमक होऊन शासन व प्रशासनाला वेठीस धरून सभेला संबोधित केले. त्यानतंर हतिदा येथील सरपंच गंगा जावरकर यांनी पिण्याचे पाण्यासाठी महिलांना नदीनाल्यातून किती पायपीट करावी लागत आहे. महाराष्ट्र जनक्रांती सेना चे संस्थापक अध्यक्ष मन्ना दारसिंबे यांनी सभेला संबोधित करीत प्रशासनाला धारेवर धरत आये हैं तो,बिजली लेकर जायेगें,हम फुकट मे बिजली नाहीं मांग रहे हैं, शेतकऱ्यांनी गेल्या चार ते पाच वर्षापासून वीज जोडणी साठी पैसे भरले परंतू अद्याप हि त्यांना कनेक्शन दिल्या गेले नाहीं. हा आदिवसी वरील मोठा अन्याय आहे. आमच्या मागण्या पूर्ण होणार नाही तोपर्यंत आम्हीं आंदोलन मागे घेणार नाही. अशी स्पष्ट भूमिका मन्ना दारसिंबे यांनी घेतली. त्यानतंर तहसिलदार प्रदीप शेवाळे, ठाणेदार अशोक जाधव, व वीज वितरण कंपनीचे मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी व त्यांचे सहकारी कार्यकारी अभियंता, उभियांता व इतर आंदोलनस्थळी येऊन आंदोलकासोबत चर्चा केली. दिवसात विजेची समस्या निकाली काढण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले.


# ग्राम पंचायत कार्यालय शिवणगांव ( फ. )

## पंचायत समिती तिवसा, जिल्हा परिषद अमरावती

### निविदा सुचना क्र. १ सन २०२४-२०२५ प्रथम वेळ

ग्रामपंचायत शिवणगांव (फ) तहसील तिवसा जिल्हा अमरावती यांचेकडून १५वा वित्त आयोग सन २०२४/२५ अंतर्गत खालील कामाकरीता निविदा बी-१ शेकडेवारी दराने मागविण्यात येत आहे. तरी जिल्हा परिषदेकडे नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांनी बी-१ निविदा द्विलीफाफा पद्धतीने सीलबंद पाकिटात निविदा/दरपत्रके सरपंच ग्रामपंचायत शिवणगांव (फ) यांचे नावे ग्रामपंचायत कार्यालय, शिवणगांव (फ) ता. तिवसा जिल्हा अमरावती येथे सादर करण्यात यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | कोटेशन प्रसिद्धी दिनांक | कोटेशन स्विकारण्याचा दिनांक | कोटेशन उघडण्याचा दिनांक व वेळ | निविदा फी | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिवणगांव (फ) पाणी पुरवठा दुरुस्ती १५ वित्त आयोग २०२३-२०२४ | ४००००/- | २५-१-२५ | ०१/०२/२०२५ | ०३/०२/२०२५ | २०० | १५ वा वित्त आयोग |
| २ | शिवणगांव (फ) विंधन विहीर १५ वित्त आयोग २०२३-२०२४ | २५००००/- | २५-१-२५ | ०१/०२/२०२५ | ०३/०२/२०२५ | ४०० | १५ वा वित्त आयोग |
| ३ | शिवणगांव (फ) पाणी पुरवठा टाकी वॉल कम्पाउंड १५ वित्त आयोग २०२३-२०२४ | २०००००/- | २५-१-२५ | ०१/०२/२०२५ | ०३/०२/२०२५ | ३०० | १५ वा वित्त आयोग |
| ४ | शिवणगांव (फ) बंधिस्त नाली बांधकाम १५ वित्त आयोग २०२४-२०२५ | २०००००/- | २५-१-२५ | ०१/०२/२०२५ | ०३/०२/२०२५ | ३०० | १५ वा वित्त आयोग |
| ५ | शिवणगांव (फ) सार्वजनिक शौचालय स्वच्छ भारत मिशन | ३०००००/- | २५-१-२५ | ०१/०२/२०२५ | ०३/०२/२०२५ | ४०० | SBM |
| ६ | शिवणगांव (फ) सार्वजनिक शोचालय स्वच्छ भारत मिशन | ३०००००/- | २५-१-२५ | ०१/०२/२०२५ | ०३/०२/२०२५ | ४०० | SBM |

१. निविदा कोटेशन प्रसिद्धी ग्रामपंचायत शिवणगांव (फ) च्या नोटीस बोर्डवर करण्यात आली आहे.
२. शासन नियमानुसार आयकर कपात, जीएसटी कपात, विमा कपात, उपकर कपात, गौणखनीज कपात करण्यात येईल.
३. निविदा कोटेशन कार्यालयीन वेळेत स्विकरण्यात येईल.
४. निविदा कोटेशन मंजूर झाल्यावर वेळेत काम पूर्ण करावे लागेल.
५. निविदा कोटेशन मंजूरीचे सर्व अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहे.
६. सदर कामाची 1 % बायाना रक्कम डी डी स्वरूपात स्वीकारली जाईल

**सरपंच**
**ग्रामपंचायत शिवणगांव ( फ )**
**पं.स. तिवसा जि. अमरावती**

**सचिव**
**ग्रामपंचायत शिवणगांव ( फ )**
**पं.स. तिवसा जि. अमरावती**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# रात्रीचे ओलीत करताना शेतकऱ्यांची तारेवरची कसरत

**नादुरुस्त रोहित्रामुळे जीव धोक्यात**

**चांदूर बाजार तालुक्यातील विदारक चित्र**

**आठवड्यात केवळ 9 तास दिवसा वीजपुरवठा**





**बादल डकरे**

**चांदूर बाजार,( दि.29 )** - कडाक्याची थंडी, किर्र अंधार, नादुरुस्त रोहित्रामुळे केव्हाही अघटित घडण्याची भीती अशा विपरीत परिस्थितीत रात्रीच्या वेळी जीव धोक्यात टाकून शेतातील पिकांचे सिंचन करण्याची विदारक वेळा चांदूरबाजार तालुक्यातील शेतकऱ्यांवर आली आहे. वीज वितरण कंपनी आणि राज्य सरकारचा नाकर्तेपणा त्यासाठी कारणीभूत ठरत आहे. आठवड्यातून तीन दिवस केवळ नऊ तास दिवसा वीज पुरवठा करण्यात येत असल्याने शेतात पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना अक्षरश: तारेवरची कसरत करावी लागत आहे.

निवडणुकी आधी सत्ताधाऱ्यांनी कायमस्वरूपी दिवसा शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना वीज उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. काही दिवस ते पाळलेही गेले. आता मात्र सरकारचे हे आश्वासन हवेत विरल्याचे चित्र आहे.

सध्या चांदूरबाजार तालुक्यात आठवड्यातून केवळ तीन दिवस प्रत्येकी दररोज तीन तास अर्थात केवळ नऊ तास दिवसा वीजपुरवठा करण्यात येत आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी सध्या कांदा लागवडीला सुरुवात केलेली आहे कांद्यासह अन्य पिकांना पाणी देणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा ही पिके हत्ती जाऊ शकतात. दिवसा त्यांना योग्य त्या प्रमाणात विजेअभावी पाणी देता येणे शक्य होत नसल्याने रात्रीच्या अंधारात जीव धोक्यात टाकून पिकांचे ओलीत शेतकऱ्यांना करावे लागत आहे. अशातच तालुक्यात अनेक ठिकाणी रोहित्र नादुरुस्त आहेत. त्यामुळे केव्हा अघटित घडून शेतकऱ्यांना त्याचा फटका बसेल हे सांगता येत नाही. पिकांच्या सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध करून देणे आणि नादुरुस्त रोहित्रांमध्ये सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता असताना वीज वितरण वितरण आणि संबंधित जनप्रतिनिधी मात्र त्याबाबत पूर्णत: उदासीन असल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे.

गेल्या महिन्यात चार वेळा अवकाळी पाऊस झाला. त्यात शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठे नुकसान झाले. शेतकरी आर्थिक संकटात असतानाच महावितरणने वीज बिलाच्या वसुलीसाठी सक्तीचे धोरण अवलंबिले आहे. कोरोना काळात संपूर्ण जग थांबलेले असताना शेतकरी मात्र थांबला नाही. त्याला फ्रंट वर्करचा दर्जा देऊन संरक्षण देणे गरजेचे होते. मात्र त्याकडे सपशेल दुर्लक्ष करण्यात आले. शेतकऱ्यांना विमा कवचही देण्यात आले नाही. त्याच्या मालाला योग्य भावही मिळत नाही. सत्ताधाऱ्यांकडून केवळ आश्वासने दिली जात असल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या आहेत. आपली अवहेलना होत असल्याची भावना आता शेतकऱ्यांमध्ये तीव्रतेने निर्माण झाली आहे.

चांदूरबाजार तालुक्यात सध्या शिरसगाव कसबा महसूल मंडळातील काजळी, माधान, कोदरी, देऊरवाडा या भागात मोठ्या प्रमाणात कांद्याची लागवड करण्यात आली आहे. मात्र दिवसा ओलितासाठी वीज उपलब्ध होत नसल्याने रात्री कडाक्याच्या थंडीत, अनवाणी पायाने मातीची ढेकळे तुडवीत कांद्यासह संत्रा, हरभरा, गहू या पिकाला शेतकऱ्यांना पाणी द्यावे लागत आहे. शेतकऱ्यांना या त्रासातून सोडविण्यासाठी जबाबदार जनप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा अशी मागणी करण्यात येत आहे.

## ग्राहकांपेक्षा स्वहित महत्त्वाचे

ग्राहकाचे हित हे महावितरणचे ध्येय असे फलक महावितरणच्या प्रत्येक कार्यालयात लावलेले बघायला मिळतात. मात्र प्रत्यक्षात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी ग्राहकांऐवजी स्वहितच महत्त्वाचे असल्याचे दिसून येते अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मुख्यालयाच्या ठिकाणीच मुक्कामी असण्याचा नियम आहे. त्यानंतरही बहुतांश अधिकारी, कर्मचारी जिल्ह्याच्या ठिकाणाहून आपल्या सोयीनुसार कार्यालयात येतात. ग्राहक तक्रार घेऊन आल्यास नेहमीच साहेब दौऱ्यावर असल्याचे सांगितले जाते. बऱ्याच ठिकाणी झालेले बिघाड अनेक दिवस दुरुस्त करण्यात येत नाही. रोहित्र बदलल्याच्या नोंदी केवळ कागदोपत्री केल्या गेल्याचे गंभीर प्रकार घडले आहेत. त्यामुळे अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी केली जाणे गरजेचे आहे असे ग्रामस्थांकडून बोलले जात आहे.

“अनेक वर्षांपासून शेतात डीपी आहे. मात्र त्यामध्ये ना कधी फ्युज पाहिला ना कधी त्याची दुरुस्ती होताना पाहिली. नादुरुस्ती झाली अथवा काही अडचण आली तर महावितरणचे कर्मचारी येत नाहीत. आम्हाला स्वत:च दुरुस्तीचे काम करावे लागते

**गोपाल किटुकले, युवा शेतकरी फुबगाव.**

“शेतीला आठवड्यातून केवळ नऊ तास दिवसा वीज पुरवठा केला जातो. त्यामुळे रात्रीच्या अंधारात कडाक्याच्या थंडीत शेतात जाऊन पिकांचे सिंचन करण्याचे काम करावे लागते. विंचू व सापाचा धोका असतो. नादुरुस्त रोहित्रांमुळे कृत्रिम संकट ओढावून जीवही संकटात येऊ शकतो. एकप्रकारे हा शेतकऱ्यांचा छळच आहे.

**वैभव फुसे, शेतकरी काजळी.**

“कितीही संकटे आली तरी शेतकरी थांबवत नाही. कोरोनाच्या संकटानंतरही शेतकऱ्यांची कामे सुरूच होती. पण शेतकऱ्यांना वाली कोणीच नाही. त्याचा विचार कोणीही करीत नाही. शेतकऱ्यांच्या जीवावर निवडून येणारे राजकारणी लोकप्रतिनिधी बनल्यावर आमच्या प्रश्नांना केराची टोपली दाखवतात, हे दुर्दैव आहे.

**स्वप्निल देशमुख, युवा शेतकरी.**

# शेतकऱ्यांना फार्मर आयडी ग्रामपंचायत मधूनच उपलब्ध करून द्या!

**बच्चू कडू यांची मागणी | जिल्हाधिकाऱ्यांना दिले पत्र**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )**- राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना एकाच छताखाली मिळवून देण्याच्या उद्देशाने त्यांचा फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळखपत्र तयार करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. मात्र संगणक केंद्र संचालकांकडून ओळखपत्र तयार करताना शेतकऱ्यांची आर्थिक लुबाडणूक केली जात असल्याचा आरोप माजी मंत्री बच्चू कडू यांनी केला आहे. तसेच फार्मर आयडी तयार करण्यासाठी खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांना तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. हे टाळण्यासाठी ग्रामपंचायतीतूनच संबंधित गावातील शेतकऱ्यांना फार्मर आयडी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी बच्चू कडू यांनी केली आहे.

या संदर्भात बच्चू कडू यांनी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना एक पत्र सादर केले आहे. ग्रामपंचायत स्तरावरील संगणक परिचारकांकडूनच शेतकऱ्यांना फार्मर आयडी तयार करून देणे आवश्यक असल्याचे बच्चू कडू यांनी पत्रात म्हटले आहे. फार्मर आयडी तयार करण्याची व्यवस्था गावातच झाल्यास शेतकऱ्यांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची गरज पडणार नाही. त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्हीही वाचेल. ग्रामीण भागात प्रामुख्याने शेतकरी व शेतमजूर राहतात. कुठल्याही कामासाठी तालुक्याला जावे लागल्यास त्यांना आपली मजुरी सोडावी लागते. या महागाईच्या काळात शेतकरी, शेतमजुरांसाठी ते परवडणारे नाही, याची प्रशासनाने दखल घेण्याची गरज आहे. असे बच्चू कडू यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

# उद्यापासून जि.प. अधिकारी व कर्मचारी क्रीडा महोत्सव

**16 संघात 3 हजार अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग**

## विभागीय क्रीडा संकुलात आयोजन




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )** - अमरावती जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचार्यांच्या क्रीडा स्पर्धा 30 जानेवारी ते 2 फेब्रुवारी या कालावधीत शहरातील विभागीय क्रिडा संकुलात आयोजित करण्यात आल्या आहेत. 14 तालुका संघांसह एकुण 16 संघातून 3 हजार अधिकारी आणि कर्मचारी या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. सांघिक व वैयक्तीक स्वरुपात या स्पर्धा होणार आहे. या क्रीडा स्पर्धांच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवारी सकाळी 10 वाजता जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र राहतील. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, सहाय्यक जिल्हाधिकारी अमर राऊत, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, डीआरडीएच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी अश्वीनी मारणे, समाज कल्याण अधिकारी ज्ञानोबा पुंड, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील जाधव, डॉ. पुरुषोत्तम सोंळके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सुरेश आसोले, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, कृषि विकास अधिकारी मलप्पा तोडकर, संजय खारकर, नारेगाचे प्रभारी उपमुख्य कार्यकारी प्रतीक चन्नावार, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहरे उपस्थित राहणार आहे. अशी माहीती क्रिडा महोत्सवाचे सचिव व क्रीडा संयोजक डॉ. नितिन उंडे यांनी दिली.

### 30 जानेवारीला सांस्कृतिक कार्यक्रम

या क्रीडा स्पर्धांमध्ये खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, फुटबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, टेनिक्रॉईट, कॅरम, तसेच 100 मिटर धावणे, थाळी फेक, गोळा फेक, भाला फेक, 200 मिटर धावणे, 400 मिटर धावणे, 1500 मिटर धावणे, रिले रेस, लांब उडी, उंच उडी, स्विमिंग व बुद्धिबळ आदी क्रीडा प्रकारात स्पर्धा घेण्यात येणार आहेत. 30 जानेवारीला संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात भक्तीगीत, भावगीत, लोकगीत, सिनेगीत, हास्यजत्रा, समूहनृत्य, कारओके, एकल नृत्य व आदींचा समावेश आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या विदर्भ अध्यक्ष पदी नयन मोंढे



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )** - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची राज्यस्तरीय बैठक आणि पदनियुक्त सोहळा पुणे येथील मोरेश्वर सभागृह, निशीगंधा बँक्वेट या ठिकाणी पार पडला मंगळवार(ता.28) रोजी पार पडला. यावेळी लोकमतचे गोविंद वाकडे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्ष पदी तर विदर्भ अध्यक्ष पदी अमरावती येथील दैनिक विदर्भ मतदारचे नयन मोंढे प्रदेश कार्याध्यक्षपदी निलेश सोमानी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक संजय भोकरे, ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोकराव वानखेडे, ज्येष्ठ पत्रकार तथा राजकीय विश्लेषक हेमंत देसाई, पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासाव आरोटे कांबळे यांच्या उपस्थितीत करण्यात आली आहे. नयन मोंढे संघटनेचे सर्वसामान्य सदस्य, जिल्हाध्यक्ष, तसेच पश्चिम विदर्भ अध्यक्ष म्हणून संघटनेत गत 15-16 वर्षापासून कार्यरत आहेत. विदर्भ अध्यक्षपदी नयन मोंढे यांची नियुक्ती झाल्याने विदर्भातील विविध जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ‘एक शाम देश के नाम’ कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध

**प्रजासत्ताक दिनी सुमधुर गीतांची मैफिल | दर्यापूर पोलीस ठाण्यात आयोजन**



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.29 )**- दर्यापूर पोलीस विभाग व शहरातील माऊली ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने 26 जानेवारी, प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस ठाण्याच्या आवारात एक शाम देश के नाम हा सुमधुर गीतांचा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सादर करण्यात आलेल्या बहारदार गीतांनी दर्यापूर शहरातील रसिकांना मंत्रमुग्ध केले होते. जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक संजय कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनात या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी नंदू परळकर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमात सहभागी कलावंतांनी अभंग, भावगीत, नाट्यगीत, गझल, देशभक्ती गीत आदींचे बहारदार सादरीकरण करून उपस्थित रसिकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन गजानन सरदार यांनी केले. दर्यापूरचे ठाणेदार सुनील वानखडे व त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आजच्या धकाधकीच्या जीवनात व्यस्त आयुष्यातून थोडासा वेळ काढून संगीताच्या माध्यमातून स्वत:ला रिझवण्याची संधी रसिकांना मिळाली, याबद्दल रसिकांतर्फे दर्यापूर पोलिसांचे आभार मानण्यात आले.



# शिक्षणाचा उपयोग समाज, देशासाठी करावा

**जिप सीईओ संजीता मोहपात्र यांचे प्रतिपादन**

**गर्ल्स हायस्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनाला सुरुवात**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.29 )**- विद्यार्थ्यांनी स्वप्न पाहिले पाहिजे, ते साध्य करण्यासाठी शिक्षण महत्वपूर्ण आहे. शिक्षणाचा उपयोग स्वत:शिवाय समाज-देशासाठी झाला पाहिजे. असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र यांनी केले. जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा (गर्ल्स हायस्कूल) कॅम्प अमरावती येथील वार्षिक स्नेहसंमेलन 28 ते 30 जानेवारी दरम्यान होत आहे. या संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी सिईओ मोहपात्र बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख होत्या. प्रमुख उपस्थिती डायटचे प्राचार्य डॉ. मिलिंद कुबडे, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहरे, उपशिक्षणाधिकारी अनिल कोल्हे, बुद्धभूषण सोनोने, दीपक कोकतरे, शिक्षण विस्तार अधिकारी प्रविण खांडेकर, संगीता सोनोने, आश्विन मानकर, अजित पाटील, शाळा समितीच्या अध्यक्षा वृंदावना बोरकर, संदीप घाटे यांची होती. प्रारंभी, मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर रांगोळी, पाककला, पुष्पप्रदर्शनी, विज्ञान प्रदर्शनीचे मान्यवरांच्या हस्ते उदघाटन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक तथा गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे यांनी केले. संचालन सिबल शेख व अनुष्का मेश्राम यांनी केले. तर, आभार सृष्टी घाटे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्रीमजी परळकर, अतुल कडू, माधवी सावरकर, निलिमा राणे, प्राजक्ता गावंडे, विलास निचित, चारुशिला राऊत, बाळकृष्ण आंधळे, शेषराव मडावी, गजेंद्रसिंह धनांवत, विरेंद्रसिह ब्राम्हण, नितीन लोनाग्रे, गोपाल बोकडे, मंगेश मानकर, भावना चव्हाण यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# अमरावतीत भरलाय बालनाट्याचा महाकुंभ

**21व्या राज्य बालनाट्य स्पर्धेला सुरुवात | 31 जानेवारी पर्यंत अनेक नाट्यकृतींचे सादरीकरण**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )**- शहरातील सिपणा महाविद्यालयाच्या सभागृहात 21 व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेला प्रारंभ झाला आहे. अमरावती केंद्राची ही प्राथमिक फेरी असून त्यात विविध संस्थांद्वारे वेगवेगळी बालनाट्य सादर केली जात आहेत. राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाने या बालनाट्य स्पर्धेचे आयोजन केले आहे.

या स्पर्धेत 43 संस्थांनी सहभाग घेतला असून दररोज सकाळी 10 ते सायंकाळी 5 या कालावधीत बालनाट्य सादर केले जात आहेत.

गेल्या वीस वर्षांपासून ही राज्य बालनाट्य स्पर्धा आयोजित केली जात आहे. स्पर्धेत सादर केली जात असलेली बालनाट्य पाहण्यासाठी रसिकांची गर्दी होत आहे. आणखी दोन दिवस बालनाट्यांची मेजवानी रसिकांना मिळणार असून कलावंतांना दाद देण्यासाठी रसिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चौरे यांनी केले आहे. नाट्यकृती बघण्यासाठी उपस्थित राहून कलावंतांचा आनंद द्विगुणित करावा, अशी विनंती अखिल भारतीय नाट्य परिषद नियामक मंडळाचे सदस्य ॲड. प्रशांत देशपांडे तसेच अखिल भारतीय नाट्य परिषदचे अध्यक्ष ॲड. चंद्रशेखर डोरले व स्पर्धा समन्वयक विशाल फाटे आणि सहसमन्वयक कोमल तायडे यांनी केले आहे.




## जाहीर नोटीस

अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील (कु. स्नेहा रा. जाधव) दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र. ६६४/२०२४ ने.ता. १८/०२/२०२५

हसरतउल्लाह खान बरकतउल्लाह खान वय ३६ वर्षे धंदा- घरकाम
रा. गणेश नगर, अंजनगांव सुर्जी ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती ...... अर्जदार
विरूद्ध
निरंक ..... गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडिल नामे बरकतउल्लाह सलामउल्लाह खॉं यांचा दिनांक २४/०८/२०१३ रोजी मृत्यू झाला आहे. नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाण आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | आरेफा खातून बरकतउल्लाह खॉं | वय ८७ वर्षे | पत्नी |
| २ | कुदरतउल्लाह खान बरकतउल्लाह खान | वय ६२ वर्षे | मुलगा |
| ३ | नुसरतउल्लाह खान बरकतउल्लाह खान | वय ५७ वर्षे | मुलगा |
| ४ | रजिया खातून अताउल्लाह खान | वय ५२ वर्षे | मुलगी |
| ५ | जाकीयाबी हफिजोद्दीन | वय ५० वर्षे | मुलगी |
| ६ | हसरतउल्लाह खान बरकतउल्लाह खान | वय ४८ वर्षे | मुलगा |
| ७ | हिदायतउल्लाह खान बरकतउल्लाह खान | वय ४६ वर्षे | मुलगा |
| ८ | शौकतउल्लाह खान बरकतउल्लाह खान | वय ४५ वर्षे | मुलगा |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

बरकतउल्लाह सलामउल्ला खॉ हे मरण पावलयामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०१/२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशासार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर,अंजनगांव सुर्जी जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील (श्री. एस.एम. जाधव) दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र. ६९३/२०२४ ने.ता. ०३/०३/२०२५

अनंत गजाननराव ताडे वय ३२ वर्षे धंदा- नोकरी
रा. पो. अंजनगांव सुर्जी ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती ...... अर्जदार
विरूद्ध
निरंक ..... गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडिल नामे गजानन गोविंदराव ताडे यांचा दिनांक ०२/१२/२०२४ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाण आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | अनिता गजानन ताडे | वय ५६ वर्षे | पत्नी |
| २ | अनंत गजाननराव ताडे | वय ३२ वर्षे | मुलगी |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

गजानन गोविंदराव ताडे हे मरण पावलयामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/०१/२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशासार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर,अंजनगांव सुर्जी जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील (श्री. एस.एम. जाधव) दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र. ६६७/२०२४ ने.ता. २०/०२/२०२५

नंदाताई श्रीकृष्ण गोरडे व इतर वय ६३ वर्षे धंदा- घरकाम
रा. विहीगांव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती ...... अर्जदार
विरूद्ध
निरंक ..... गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची आई कौसल्या पांडूरंग अंबाडकर यांचा दिनांक १६/०७/२०२४ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराचे वडील नामे पांडूरंग सिताराम अंबाडकर यांचा दिनांक ०८/०९/२००९ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाण आहेत.

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | नंदाताई श्रीकृष्ण गोरडे | वय ६३ वर्षे | मुलगी |

कौसल्या पांडूरंग अंबाडकर हे मरण पावलयामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत शिवराम गेंदाजी डोंगरदिवे यांचे नावे असलेली मौजा खुर्चनपूर ता. दर्यापूर जि. अमरावती येथील गट क्र. १५, क्षेत्रफळ १ हे.१९ आर. शेतजमीन असून त्याची अंदाजे बाजारभाव किंमत रूपये ५०,०००/- आहे. त्यामुळे अज्रदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०१/२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशासार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर,अंजनगांव सुर्जी जि. अमरावती**